पंधरावी
आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# 'जागतिक स्तरावर शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान'

## भाग एक


संपादक
डॉ. स्नेहल तावरे
डॉ. शोभा इंगवले



स्नेहवर्धन प्रकाशन
पुणे

१४) श्री शाहू महाराजांचा सकलजनवादी विचार डॉ. वैशाली पवार /६३
१५) राजर्षी शाहू महाराजांचा सामाजिक दृष्टिकोण डॉ. कल्पना गावडे /६७
१६) छत्रपती राजर्षी शाहू महाराज – सुधारणावादी समाजसुधारक आणि लोकनेते डॉ. वंदना चव्हाण /७१
१७) जागतिक स्तरावर छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान डॉ. डी. एस. बोरकर /७५
१८) राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान डॉ. गणेश मालटे /७९
१९) स्त्री संरक्षण व स्त्री शिक्षणाचे आधारस्तंभ – छत्रपती राजर्षी शाहू महाराज डॉ. शुभांगी कुऱ्हाडे /८३
२०) राजर्षी शाहू महाराज यांचे योगदान डॉ. विक्रम जाधव /८७
२१) राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक योगदान डॉ. दीपक गायकवाड /९१
२२) राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक योगदान डॉ. मंदा नांदुरकर /९५
२३) लोककल्याणकारी राजा : राजर्षी छत्रपती शाहू महाराज डॉ. प्रतिभा घाग /९९
२४) समाजसुधारक राजर्षी शाहू महाराज यांचे बहुजनांसाठीचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान डॉ. जगदीश खैरे /१०३
२५) छत्रपती शाहू महाराजांच्या कृती कार्यक्रमातील 'सामाजिक न्याय' डॉ. माणिक सोनावणे /१०७
२६) शाहू महाराजांचे कलाप्रेम डॉ. वैजयंतीमाला जाधव /१११
२७) राजर्षी शाहू महाराज यांचे क्रीडा योगदान डॉ. सुदाम शेळके /११५ प्रा. रूपेश थोपटे
२८) राजर्षी शाहू यांचे शैक्षणिक योगदान डॉ. सारिका बहिरट /११७
२९) राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे कृषी क्षेत्रातील योगदान प्रा. प्रशांत आरसुळ /१२१
३०) जागतिक स्तरावर शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान प्रा. विवेक खटवटे /१२५

३१) छत्रपती शाहू महाराज : एक समाजक्रांतिकारक प्रा. संगीत
३२) जागतिक स्तरावर शाहू महाराज यांचे शैक्षणिक योगदान प्रा. लक्ष्म
३३) जागतिक कीर्तीचे असामान्य व्यक्तिमत्त्व – राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रा. गौ
३४) थोर विचारवंत शाहू – फुले – आंबेडकर प्रा.
३५) श्री शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण क्षेत्रातील य प्रा.
३६) बहुजन शिक्षण उद्धारक : लोकराजा राजर्षी शाहू महाराज प्रा. यो
३७) राजर्षी शाहू महाराज : शैक्षणिक व सामाजिक योगदान प्रा. ब्र
३८) राजर्षी शाहू महाराज यांचे समाज व विधी क्षेत्रातील योगदान प्रा
३९) राजश्री शाहू महाराजांचे सामाजिक योगदान प्रा
४०) पर्यटनातून घडलेले एक दीपस्तंभ – राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रा. संजयादेव
४१) छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांनी प्रभावित झालेले कृष्णराव भेगडे यांचे शैक्षणिक योगदान प्रा. वै
४२) राजर्षी शाहू महाराज : एक युगप्रवर्तक
४३) जागतिक स्तरावर शाहू महाराज यांचे योगदान
४४) राजर्षी शाहू महाराजांचे समर्थ वारसदार – छत्रपती राजाराम महाराज
४५) राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक कार्य
४६) राजर्षी शाहू महाराजांचे योगदान

# श्री शाहू महाराजांचा सकलजनवादी विचार

**डॉ. वैशाली प्रकाश पवार**
**भ्रमणभाष : ८९२८१७५९९९**

**आत्मसन्मानाची चळवळ**

श्री शाहू महाराजांच्या विचार व कार्यामध्ये आत्मसन्मान हे एक मध्यवर्ती सूत्र आहे. त्यांनी आत्मसन्मानासाठी सातत्याने संघर्ष केला. वेदोक्त प्रकरण, छात्रजगद्गुरूंची नेमणूक या प्रक्रियेमध्ये आत्मसन्मानाला महत्त्व दिले. त्यांनी स्व निवडीचे स्वातंत्र्य घेतले. त्यामुळे आत्मसन्मान या गोष्टीला महत्त्व प्राप्त झाले. तसेच त्यांनी आत्मसन्मान या तत्त्वावर आधारलेल्या चळवळी आणि विचारवंतांच्या विचारांचे समर्थन केले. महात्मा फुले, पेरीयार स्वामी नायकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य आत्मसन्मान म्हणून महत्त्वाचे मानले होते. श्री शाहू महाराजांचा राज्यव्यवहार, कायदे, निर्णयप्रक्रिया ही आत्मसन्मानाच्या तत्त्वावर आधारलेली होती. त्यांनी आत्मसन्मान हा आंतरिक भाग म्हणून स्वीकारला. त्यांनी विविध जातींतील मुलांसाठी वसतिगृहे व शिक्षणाची चळवळ सुरू केली. यामध्येदेखील त्यांनी आत्मसन्मान महत्त्वाचा मानला होता. अस्पृश्यता आणि जातिभेद या दोन्हीही गोष्टी शाहू महाराजांनी नाकारल्या. शाहू महाराजांनी जातीवर आधारलेली वसतिगृहे काढली. ही वसतिगृहे पूर्ण समतेकडे जाण्याच्या मार्गातील एक मधला टप्पा होती. परंतु त्यांना एकत्रित व समतेवर आधारलेली अस्मिताच अपेक्षित होती.

तसेच श्री शाहू महाराजांनी मुलींच्या शिक्षणासाठी स्वतंत्रपणे कायदे केले. ४ ऑक्टोबर १९०७ च्या कायद्याने अस्पृश्य समाजातील मुलींच्यासाठी शाळा मंजूर केली. तसेच स्त्री शिक्षणासाठी अंदाजपत्रकात आर्थिक तरतूद केली (पवार जयसिंगराव, २००७ : ७४). या उदाहरणावरूनदेखील असे दिसून येते की, न्यायाची सुरूवात श्री शाहू महाराजांनी तळागाळातून केली होती. अस्पृश्यता निर्मूलन करण्यासाठी त्यांनी कायदे केले. त्यांनी अस्पृश्यांसाठी असणाऱ्या स्वतंत्र शाळा बंद केल्या व स्पृश्य अस्पृश्य मुले एकत्रितपणे शिकण्याची पद्धत सुरू केली. या प्रक्रियेमध्येदेखील सर्वांचा आत्मसन्मान या गोष्टी दिसतात (पवार जयसिंगराव, २००७ : ७४). २७ जुलै, १९१८ ला त्यांनी अस्पृश्य मुक्तीचा कायदा केला. तसेच त्यांनी गुन्हेगार जातींची ओळख खोडून काढली. श्री शाहू महाराजांनी गुन्हेगार जातींना गुन्हेगारी अस्मितेतून बाहेर काढून आत्मसन्मानाची ओळख दिली. हजेरी पद्धत, वेठवरळा पद्धत, वतन पद्धत बंद केली. तसेच गठ्ठेचोर अशा ओळखी निर्माण झालेल्यांना त्यांनी पूर्णपणे नष्ट

केल्या (पवार जयसिंगराव, २००७ : ७६-७७). थोडक्यात श्री शाहू महाराजांनी व्यक्तीची हिंदू समाजातील परंपरागत वर्चस्वाच्या पद्धतीमधून मुक्ती केली आणि त्यांना स्वत:ची अस्मिता प्राप्त करून दिली. भटक्या विमुक्त जातींना त्यांनी न्याय दिला. त्यांना गुन्हेगारी अस्मितेतून तर मुक्त केलेच शिवाय त्यांना राहण्यासाठी घरे, नव्या वस्त्या वसवल्या. त्यांना आत्मसन्मान दिला.

**शैक्षणिक चळवळ –**

शिक्षण हे व्यक्तीच्या विकासाचे मुख्य साधन आहे. व्यक्ती व समाजाची प्रगती शिक्षणातून होऊ शकते. शाहू महाराज शिक्षणाकडे इंग्रजांप्रमाणे बळ म्हणून पाहत नव्हते. त्यांनी शिक्षणासंबंधीचा महात्मा फुलेंचा दृष्टिकोन स्वीकारला होता. त्यांनी मनुष्य असण्याशी विद्येचा संबंध जोडला होता. ज्ञानवंत होणे हा मुद्दा मनुष्याला पशूपासून वेगळा करतो. बहुजन समाजाच्या उन्नतीचा मार्ग शिक्षण आहे. बहुजन समाजाला ज्ञानार्जन करण्याचा अधिकार असला पाहिजे. बहुजन समाजाचे दैन्य, दारिद्र्य, गरिबी, मागासलेपण, वंचितता यांतून मुक्तता करावयाची असेल तर त्याला शिक्षण दिले पाहिजे हे ओळखून महात्मा फुलेंनी ब्रिटिश सरकारकडे सक्तीच्या मोफत शिक्षणाची १८८० पासून सतत मागणी केली. श्री शाहू महाराजांनीदेखील सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा आग्रह धरला. बहुजन समाजामधील गुणवत्ता, कौशल्य, क्षमता विकसित होण्यासाठी शिक्षण गरजेचे आहे असे शाहूंना वाटत होते. २१ सप्टेंबर १९१७ रोजी शाहू महाराजांनी सक्तीच्या शिक्षणाचा कायदा केला. यानुसार संस्थानामध्ये प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले गेले. शाहू महाराजांचा हा शिक्षणविषयक उदारमतवादी दृष्टिकोन प्लेटोच्या विचारांशी साधर्म्य असलेला आढळतो. राज्यसंस्थेच्या खर्चातून प्रत्येकाला सार्वत्रिक व मोफत शिक्षण देण्याचा विचार त्याने मांडला होता. तो शाहू महाराजांनी प्रत्यक्षात अंमलात आणला. त्यांनी जे माता-पिता आपल्या पाल्याला शाळेत पाठविणार नाहीत अशा पालकांना प्रत्येकी एक रुपया दर महिना दंड करण्याची तरतूद केली होती. ५०० ते १००० लोकसंख्या असलेल्या गावामध्ये प्राथमिक शाळा सुरू केली. अशा ९६ शाळा सुरू केल्या. या कायद्यामुळे सुमारे पाऊण लाख ग्रामीण भागातील लोकांच्या टप्प्यात प्राथमिक शिक्षण आले. त्यापैकी साडेचार हजार मुले शिक्षण घेऊ लागली. १९१७-१८ सालात २७ शाळा, १२९६ मुले व एक लाख रुपये खर्च तर १९२१-२२ सालापर्यंत ४२० शाळा व २२,००७ मुलांची संख्या व तीन लाख रुपये खर्च शाहू महाराज प्राथमिक शिक्षणावरती करत होते (पवार जयसिंगराव, २०१४- ९९). सरंजामदार, इनामदार यांच्या उत्पन्नावर १० ते २० टक्के शिक्षणपट्टी आकारली जात होती. १९३० साली मुंबई इलाख्यात ही तरतूद एक लाख करण्यात आली होती.

श्री शाहू महाराजांचे बहुजनांना मोफत शिक्षण देण्याचे तत्त्व यशवंतराव चव्हाणांनी प्रत्यक्ष धोरण व कृतीमधून अंमलात आणलेले दिसते. शिवाजी विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, रयत शिक्षण संस्था, स्वामी विवेकानंद



शिक्षणसंस्था या शिक्षणसंस्थांचे कार्यक्षेत्र श
संस्थांच्या विकासासाठी चव्हाण यांनी कष्ट
नेले. शाहूंच्या शिक्षणविषयक विचारांचाच ह

**महिला चळवळ –**

शाहू महाराजांचा महिलांबाबतचा दृष्टिकं
दिसतो. पुरुषांप्रमाणे महिलादेखील माणूस अ
मिळाली पाहिजे. त्यांना स्वातंत्र्य, समता व
महाराजांचा विचार होता. त्यांनी आपल्या संस्था
पुरुषांवरती दिली नाही तर रखमाबाई केळवकर
सोपविली. तिची शिक्षण अधिकारी म्हणून
असतानादेखील मुलींसाठी स्वतंत्र शाळा सुरू
महाराजांनी महिलांना केवळ समान संधी दिली
दिली. विशेष संधीचे तत्त्व भारतीय राज्यघटनेतदे
शिक्षण घेणाऱ्या मुलींना शाहू महाराजांनी उच्च शि
कन्या कृष्णाबाई यांना वैद्यकीय शिक्षण घेण्यास
पाठविले. त्यानंतर संस्थानामध्ये सेवेत रुजू क
घटस्फोट, दत्तकविधान, आत्मसन्मान, प्रतिष्ठा,
पुरस्कार, पुनर्विवाहाचा कायदा, जातिसंस्थेवि
छळाविरोधीचा अधिकार या पद्धतीने शाहू महार
केली. तसेच त्यांनी कुटुंबाला सार्वजनिक कार्य
शिक्षणाचा हक्क, संपत्तीचा हक्क, पुनर्निर्णया
स्त्रियांना देवून त्यांनी सामाजिक न्यायाच्या संकल
श्री शाहू महाराजांनी आंतरजातीय विवाहाचा पुरस
यशवंतराव होळकरांशी केला. श्री शाहू महाराज
विवाह झाले (पवार जयसिंगराव, २००७ - ११
विवाह हा एक महत्त्वाचा कार्यक्रम डॉ. बाबास
यामुळे जातिसंस्था आणि हिंदू समाजातील न्याय
जाते, हीदेखील न्यायाच्या संदर्भातील एक घडा
मध्ये कोल्हापूर संस्थानात विधवांच्या पुनर्विवाहा
संमत केला. विधवांच्या पुनर्विवाहास मान्यता
कार्यक्रम होता. तसेच त्यांनी १९१९ मध्ये विवाह
त्यांनी स्त्रियांना क्रूरपणे वागविण्याचे नाहीसे क
नियम (घटस्फोट) हे दोन महत्त्वाचे कायदे केले.

**बहुजन चळवळ –**

बहुजन चळवळीने शाहूंचा विचार भारतभर

शिक्षणसंस्था या शिक्षणसंस्थांचे कार्यक्षेत्र शहरी भागाऐवजी ग्रामीण भाग होते. या संस्थांच्या विकासासाठी चव्हाण यांनी कष्ट घेतले. उच्च शिक्षण ग्रामीण भागात नेले. शाहूंच्या शिक्षणविषयक विचारांचाच हा विस्तार असलेला दिसून येतो.

**महिला चळवळ –**

शाहू महाराजांचा महिलांबाबतचा दृष्टिकोन उदारमतवादी स्वरूपाचा असलेला दिसतो. पुरुषांप्रमाणे महिलादेखील माणूस आहेत व त्यांना माणूसपणाची वागणूक मिळाली पाहिजे. त्यांना स्वातंत्र्य, समता व समान संधी मिळाली पाहिजे हा शाहू महाराजांचा विचार होता. त्यांनी आपल्या संस्थानातील मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी पुरुषांवरती दिली नाही तर रखमाबाई केळवकर या बुद्धिमान महिलेवरती ही जबाबदारी सोपविली. तिची शिक्षण अधिकारी म्हणून नेमणूक केली. मुलामुलींच्या शाळा असतानादेखील मुलींसाठी स्वतंत्र शाळा सुरू करण्यात आल्या. याचाच अर्थ शाहू महाराजांनी महिलांना केवळ समान संधी दिली नाही तर विशेष संधी उपलब्ध करून दिली. विशेष संधीचे तत्त्व भारतीय राज्यघटनेतदेखील दिसून येते. राजाराम कॉलेजमध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींना शाहू महाराजांनी उच्च शिक्षण मोफत केले होते. रखमाबाईंच्या कन्या कृष्णाबाई यांना वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी मुंबई व इंग्लंडला शाहू महाराजांनी पाठविले. त्यानंतर संस्थानामध्ये सेवेत रुजू करून घेतले. मालमत्ता, वारसा हक्क, घटस्फोट, दत्तकविधान, आत्मसन्मान, प्रतिष्ठा, संपत्तीत वाटा, आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार, पुनर्विवाहाचा कायदा, जातिसंस्थेविरोधी जाण्याचा अधिकार, कौटुंबिक छळाविरोधीचा अधिकार या पद्धतीने शाहू महाराजांनी स्त्रियांची गुलामगिरीतून मुक्तता केली. तसेच त्यांनी कुटुंबांला सार्वजनिक कार्यकक्षेत सामील केले. व्यक्ती स्वातंत्र्य, शिक्षणाचा हक्क, संपत्तीचा हक्क, पुनर्निर्णयाचा हक्क, छळाविरोधीचा अधिकार स्त्रियांना देवून त्यांनी सामाजिक न्यायाच्या संकल्पनेची खोली-उंची व रुंदी वाढवली. श्री शाहू महाराजांनी आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार केला. चंद्रप्रभाबाई यांचा विवाह यशवंतराव होळकरांशी केला. श्री शाहू महाराजांच्या पुढाकारातून २५ आंतरजातीय विवाह झाले (पवार जयसिंगराव, २००७ – १११). जातसंस्था अंताचा आंतरजातीय विवाह हा एक महत्त्वाचा कार्यक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुचविला होता. यामुळे जातिसंस्था आणि हिंदू समाजातील न्यायाची संकल्पना या प्रक्रियेतून मोडली जाते, हीदेखील न्यायाच्या संदर्भातील एक घडामोड त्यांनी घडवून आणली. १९१७ मध्ये कोल्हापूर संस्थानात विधवांच्या पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा संमत केला. विधवांच्या पुनर्विवाहास मान्यता म्हणजे देखील जातिअंताचाच एक कार्यक्रम होता. तसेच त्यांनी १९१९ मध्ये विवाहासंबंधीचा कायदा केला. त्याच वर्षी त्यांनी स्त्रियांना क्रूरपणे वागविण्याचे नाहीसे करावे आणि कोल्हापूरचे काडीमोडीचे नियम (घटस्फोट) हे दोन महत्त्वाचे कायदे केले.

**बहुजन चळवळ –**

बहुजन चळवळीने शाहूंचा विचार भारतभर व महाराष्ट्रात स्वीकारला. काशीराम

यांनी शाहूंचे प्रतीक स्वीकारले. शाहू महाराजांची जयंती साजरी करण्यास सुरूवात केली. तसेच शाहूंचे वैचारिक साहित्य, चरित्राचा प्रसार करण्यास सुरूवात केली. बहुजन समाज पक्षाच्या माध्यमातून काशीराम यांनी शाहूचा विचार प्रत्यक्ष राजकारणात स्वीकारला.

**समारोप –**

शाहू महाराजांचे विचार लोकशाही म्हणून विकास पावले. त्यांच्या विचारातील लोकशाहीची संकल्पना चळवळीच्या माध्यमातून उत्क्रांत होत जाते. शाहूंचा लोकशाही विचार पाश्चिमात्य न राहता भारतीय स्वरूपाचा होतो. भारतीय लोकशाही विचाराला दुसरे नाव 'सकलजनवाद' हे आहे. सकलजनवाद हा विचार युरोपियन उदारमतवादापेक्षा वेगळा आहे कारण या सकलजनवादामध्ये त्यावेळची परिस्थिती पाहून वंचितांच्या बाजूने निर्णय घेण्याचा हक्क लोकशाहीने सुरक्षित ठेवलेला दिसतो हेच खरे शाहूच्या विचारांचे वैशिष्ट्य आहे.

## संदर्भ सूची –


१) पवार जयसिंगराव, (संपा.), २००७, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर

२) पवार जयसिंगराव, (संपा.), २००९, श्री शाहूंचे चरित्र (श्रीशाहुचरितम्), कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

३) पवार जयसिंगराव, २०१४, राजर्षी शाहू छत्रपती – जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर

४) फडके म. दि., १९८६, शाहू छत्रपती आणि लोकमान्य, श्रीविद्या प्रकाशन, पुणे

५) कीर धनंजय (१९७०), श्री शाहू स्मारक व्याख्यानमाला, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

६) जाधव रमेश, २०१०, लोकराजा शाहू छत्रपती, सुरेश एजन्सी, पुणे

७) पवार प्रकाश, २०१४, भारतीय राजकारण आणि नेतृत्वाची वाटचाल, डायमंड प्रकाशन, पुणे

८) पवार प्रकाश, २०१५, आरंभीचे राज्यसंस्थाविषयक विचाराचे चिंतन, मुराळी, मे, गारगोटी, कोल्हापूर

९) चव्हाण रमेश (संपा.), राजर्षी शाहू महाराज यांची सामाजिक विचारधारा व कार्य, रा.ना.चव्हाण प्रतिष्ठान, पुणे


❀❀



## राजर्षी शाहू महाराजांचा

राजर्षींच्या थोरपणाचा विचार केवळ कोल
संदर्भात करण्याने राजर्षींचे मूल्य खूपच उणे ठरे
कार्य हे या कक्षेत न सामावणारे आहे. शा
सामान्याचा दत्तक योगाने राजघराण्यात प्रवेश ह
असूनही सामान्यांचे असामान्य नेते होण्याचा
कार्याचे भारताच्या व्यापक संदर्भात तत्क
त्याकाळाच्या निखळ वैचारिक विचारप्रवाहांन
करणे गरजेचे आहे. राजर्षींचा कृतिप्रवण सर्वस्प
सुधारणा कार्याच्या पार्श्वभूमीवर एकूण बदलाच
दृष्टीने समजावून घेणेच इष्ट ठरते.

राजर्षी शाहूंचा दि.२६ जुलै १८७४ रोजी
साली वयाच्या दहाव्या वर्षी दत्तक विधान रा
मध्ये वयाच्या सतराव्या वर्षी विवाह झाला.
विसाव्या वर्षी त्यांना राज्याधिकार मिळाले. रा
ते १९०५ या काळात वयाच्या सव्विसाव्या व
चळवळ उद्भवली. ताईमहाराज प्रकरण या
जानेवारी १९२१ मध्ये, वयाच्या सत्तेचाळिसा
स्थापना केली. राज्याधिकार स्वीकारण्यापासू
अठ्ठेचाळीस वर्षांच्या काळात शाहू महाराजांनी
कामे काढून शेतकऱ्यांना तगाई, स्वस्त धान्या
(१८९७) तो वेदोक्त चळवळीचा रणसंग्राम
विविध जातिधर्मातील विद्यार्थ्यांसाठी समत
करण्यापासून (१९०१ ते १९११) ते गोवध बंदी
जातीला नोकरीत पन्नास टक्के जागा राखी
(दि.२६ जुलै १९०२), ते सहकारी तत्त्वाव
करण्यापर्यंत (सप्टें. १९०६) कोल्हापूर येथे
करण्यापासून (१९११), पुढे कोल्हापूर राज्य स